संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज..
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
उपलब्ध सुविधा
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
❋ सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे ❋ गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे ❋ पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन ❋ वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी ❋ इंटरव्हेशनल सोनोग्राफी ❋ सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११७ ● ● शनिवार दि. १६ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# पुत्र प्रेमामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट; अमित शाह

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवीदिल्लीः गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक अनपेक्षित घटना घडल्या आहेत. आधी शिवसेनेत फुट पडून दोन गट तयार झाले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही तशीच परिस्थिती निर्माण झाली. या पक्ष फुटीवरुन विरोधक सतत भाजपवर टीका करत असतात. भाजपनेच शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचा आरोप विरोधकांकडून होत असतो.



आता विरोधकांच्या या आरोपांवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महत्वाची प्रतिक्रिया दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये विविध प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी गृहमंत्र्यांना विचारण्यात आले की, महाराष्ट्रात भाजपने अनेक पक्ष फोडून सत्ता स्थापन केली. पण राजकीय विश्लेषकांच्या मते सहानुभूती उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांकडे आहे. महाराष्ट्रात तुमची युती चांगली कामगिरी करेल, यावर तुम्हाला किती विश्वास आहे? याला उत्तर देताना अमित शहा म्हणाले, 'महाराष्ट्रात भाजपने एकही पक्ष फोडला नाही. या पक्षफुटीचे कारण पुत्रप्रेम आहे.'

'आदित्य ठाकरेंनी मुख्यमंत्री व्हावे, अशी उद्धव ठाकरेंची इच्छा होती. पण, आदित्य ठाकरेंना नेता म्हणून स्वीकारण्यास तयार नसलेला मोठा गट बाहेर पडला. बाळासाहेबांच्या काळापासून शिवसेनेत काम करणाऱ्या लोकांनी उद्धव ठाकरेंना नेता म्हणून स्वीकारले, पण आता त्यांना आदित्य ठाकरेंचे नेतृत्व मान्य नव्हते. 'शरद पवारांनाही आपल्या मुलीला प्रमुख बनवायचे होते. पण, पक्षातील अनेकांना हे पटले नाही आणि त्यामुळेच ते वेगळे झाले. आम्ही कोणताही पक्ष फोडला नाही. पुत्रप्रेमामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादीला तडा गेला आहे,' असं शाह यावेळी म्हणाले.

# आटपाडीत उबाठा ची आढावा बैठक संपन्न



**आटपाडी : येथे आढावा बैठकीत बोलताना जिल्हाप्रमुख संजय विभूते, बैठकीस उपस्थित मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक संपन्न झाली.

सदरची बैठक जिल्हाप्रमुख संजय विभुते यांच्या उपस्थित संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपजिल्हाप्रमुख शिवाजी शिंदे, तालुकाप्रमुख शेखर निचळ, खरसुंडी विभाग प्रमुख मोहन शिंदे, विधानसभा संघटक गौरीशंकर भोसले, तालुका संघटक निळकंठ देशपांडे, मोहन देशमुख, आटपाडी विभाग प्रमुख युवराज मंडले, युवा सेना तालुकाप्रमुख बापूसो मगर, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख सादीक काझी, मारुती मगर, विकास मगर, डॉ. शिरकांडे, निवास वाडेकर, रेणुका वाडेकर, राहुल शिंदे, दत्तात्रय खिलारी, पोपट मदने, अर्जुन पाटील, आकाश मगर, हेमंत सटाणे, मोतीराम बुधावले, किसन जाधव, दादा बुधावले आणि तालुक्यातील सर्व शिवसैनिक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# अरविंद केजरीवालांना धक्का: कोर्टातून दिलासा नाहीच, आज हजर राहावं लागणार!

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी कमी होण्याचं नाव घेत नसल्याचं चित्र आहे. कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी ईडीने वारंवार समन्स जारी करूनही केजरीवाल हे चौकशीसाठी हजर झाले नाहीत. त्यामुळे ईडीने थेट न्यायालयात धाव घेतली. ईडीने दाखल केलेल्या दुसऱ्या तक्रारीनंतर राऊस अव्हेन्यू



न्यायालयाच्या दंडाधिकारी न्यायालयाने मुख्यमंत्री केजरीवाल यांना १६ मार्चला हजर राहण्याचे आदेश दिले होते. दंडाधिकारी न्यायालयाने बजावलेल्या या आदेशालाही केजरीवाल यांच्याकडून आव्हान देण्यात आलं होतं. मात्र अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या तक्रारींच्या आधारे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जारी करण्यात आलेल्या समन्सला स्थगिती देण्यास राऊस अव्हेन्यू न्यायालयाच्या सत्र न्यायालयानेही नकार दिला आहे. याप्रकरणी ईडीचा आरोप आहे की, आप नेत्यांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये लागू झालेल्या उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ शी संबंधित एकूण १०० कोटी रुपयांची लाच घेतली आहे. लेफ्टनंट गव्हर्नर विनय कुमार सक्सेना यांच्या शिफारशीनंतर हे धोरण रद्द करण्यात आले आणि कथित अनियमिततेची केंद्रीय अन्वेषण ब्युरो चौकशी सुरू करण्यात आली. आपल्या सहा आरोपपत्रांपैकी एका आरोपपत्रात ईडीने दावा केला आहे की, मद्य धोरण अरविंद केजरीवाल यांनी केले होते. त्यामुळे चौकशीसाठी केजरीवाल यांना वारंवार समन्स जारी करण्यात आलं आहे.दरम्यान, राजकीय उद्देशाने माझ्याविरुद्ध ही कारवाई केली जात असून मी इंडिया आघाडीपासून वेगळं व्हावं, असा सत्ताधाऱ्यांच्या प्रयत्न आहे, असा आरोप अरविंद केजरीवाल यांच्याकडून करण्यात आला होता. मात्र आता न्यायालयानेही दिलासा न दिल्याने केजरीवाल यांना हजर राहावं लागणार आहे.

# मविआ वंचितला जागा देणार:संजय राऊत

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

प्रकाश आंबेडकरांचा वंचित बहुजन आघाडी हा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी झाला आहे. परंतु, मविआतल्या या चार पक्षांमधील जागावाटपासंदर्भातील चर्चा पुढे सरकलेली नाही. गेल्या अनेक दिवसांपासून चार पक्षांमधील नेत्यांच्या बैठका चालू आहेत. परंतु, जागावाटपावर त्यांचं एकमत झालेलं दिसत नाही. अशातच वंचित बहुजन आघाडीच्या नाराजीच्या बातम्या येत होत्या. तसेच प्रकाश आंबेडकर यांनीदेखील त्यांची नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली होती. दुसऱ्या बाजूला शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार आणि महाविकास आघाडीचे नेते संजय राऊत मात्र प्रसारमाध्यमांसमोर सर्वकाही आलबेल असल्याचं सांगत होते. त्याचबरोबर जागावाटपाची चर्चा पुढे न सरकण्याचं कारण विचारल्यावर संजय राऊतांनी वंचितकडे बोट दाखवलं. त्यानंतर वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले, संजय राऊत माध्यमांना चुकीची माहिती देत आहेत. यावरून महाविकास आघाडीत सारंकाही आलबेल नसल्याचं चित्र समोर आलं. अशातच महाविकास आघाडीतल्या नेत्यांनी वंचित बहुजन आघाडीला महाराष्ट्रातील लोकसभेच्या चार जागा देऊ केल्या आहेत. संजय राऊत यांनी याबाबतची माहिती दिली आहे. महाविकास आघाडीच्या प्रस्तावावर प्रकाश आंबेडकर यांनी निर्णय घ्यायचा अ ाहे, असंही राऊत म्हणाले. लोकसभेच्या जागावाटपासंदर्भात महाविकास आघाडीची आज (१५ मार्च) संध्याकाळी मुंबईतल्या ट्रायडंट हॉटेलमध्ये बैठक होणार आहे.

# शेटफळेत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : शेटफळे येथे रस्त्याच्या कामाचा शुभारंभ खानापूर विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते सुहास बाबर, सांगली जिल्हा बँकेचे संचालक आटपाडी तानाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

शेटफळे ते रेबळमळा मार्गे कोळा शिव ,शेटफळे ते सोमेवाडी हद्द, शेटफळे ते तु.बु.मळा अशा तीन रस्त्याचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. शेटफळे ते तुबूमळा हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून १कोटी ८ लाख रुपये देखभाल दुरुस्तीसह धरण्यात आला आहे. शेटफळे ते रेबाई मळा मार्गे कोळा शीव हा रस्ता ७२ लाख रुपये दुरुस्तीसाठी धरण्यात आला आहे. शेटफळे ते सोमेवाडी हद्द या रस्त्यासाठी ५५ लाख रुपये धरण्यात आले आहे

खानापूर विधानसभा मतदारसंघाचे कै. आमदार अनिलभाऊ बाबर यांचे शेटफळे या गावावर विशेष लक्ष होते. त्यांनी आतापर्यंत बंधारे, रस्ते, शाळा ,गावातील अंतर्गत रस्ते, गटारी ,विजेचे सबस्टेशन, अंगणवाडी



**शेटफळे येथे रस्ते कामाचा शुभारंभ प्रसंगी सुहास बाबर, तानाजीराव पाटील, संतोष पुजारी, सोमनाथ गायकवाड, विजय देवकर व उपस्थित मान्यवर**

दुरुस्ती,जिम , सभामंडप, पेविंग ब्लॉक ,ग्रामपंचायत दुरुस्ती इमारत ,जल जीवन पाईपलाईन ,भाग शाळा दुरुस्ती, टेंभूचे पाणी शेटफळे च्या शिवारात उपलब्ध करून दिले आहे.

या रस्त्याच्या कामाच्या शुभारंभासाठी बाजार समितीचे सभापती पै. संतोष पुजारी, युवा नेते दत्तात्रय पाटील पंच, मनोज नांगरे, अरविंद चव्हाण, सरपंच शारदा गायकवाड, उपसरपंच ज्ञानेश्वर वाघमारे, सोमनाथ गायकवाड, विजय देवकर, प्रा. चंद्रकांत गायकवाड, सुभाष अण्णा गायकवाड, किसन गायकवाड गुरुजी ,वामन गायकवाड गुरुजी, निवृत्ती गायकवाड, विलास गायकवाड, आकाश मोकाशी, रावसाहेब गायकवाड, सुरेश शेठ गायकवाड, संतोष शेठ गायकवाड, रंजीत गायकवाड ,प्रमोद गायकवाड ,बापूराव गायकवाड, अभिजीत गायकवाड पोपट गायकवाड, संभाजी देवकर नाथबाबा गायकवाड ,यशवंत गायकवाड, सुखदेव गायकवाड प्रभाकर माने ,रुपेश गायकवाड, अरविंद गायकवाड ,चंद्रकांत गायकवाड मेजर ,अनिकेत गायकवाड ,अनिल गायकवाड युवराज माने ,कल्लेश्वर गायकवाड ,श्रीकांत गायकवाड अरुण गायकवाड, संभाजी गायकवाड, राजेंद्र गायकवाड, विजय गायकवाड, संपत भिवरे महिंद्र भोरे ,पिंटू भोरे ,जयवंत गायकवाड, अमित गायकवाड, बाळासो गायकवाड, भागवत गायकवाड, सत्यजित मोकाशी, किरण महामुनी इत्यादी उपस्थित होते.

# खरसुंडी मंडळात राजस्व अभियान मेळावा उत्साहात संपन्न : तहसिलदार सागर ढवळे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील खरसुंडी मंडळ अंतर्गत खरसुंडी येथे झरे, नेलकरंजी, गोमेवाडी, खरसुंडी, घरनिकी , घानंद या सजेतील २० गावांसाठी महाराजस्व अभियान मेळावा उत्साहात संपन्न झाला असल्याची माहिती आटपाडीचे तहसीलदार सागर ढवळे यांनी दिली.

तहसीलदार सागर ढवळे म्हणाले, राजस्व अभियान अंतर्गत एकाच छताखाली लोकांना सर्व शासकीय सेवा देण्यात आल्या. हा मेळावा सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुरू होता. महसूल प्रशासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या या मेळाव्यात शासनाचे सर्व विभाग सहभागी होते. यावेळी लाभार्थ्यांना वेगवेगळ्या योजनेचा लाभ देण्यात आला.

यामध्ये नवीन मतदार नोंदणी १०, गोल्डन कार्ड २ आधार कार्ड २ , आभा कार्ड २५ प्रतिज्ञापत्र १६, तहसिलदार उत्पन्न दाखले ५, रेशन कार्ड प्रकरणे ६८, दुबार रेशन कार्ड ११, सर्कल चौकशी प्रकरणे ४, दिव्यांग लाभार्थी २, मूकबधिर १, तलाठी उत्पन्न दाखले २६, सात बारा वितरण ३६, आठ अ वितरण १९ . अशी प्रमाणपत्रे व दाखले वितरीत करण्यात आले.

> तहसील कार्यालयाच्या वतीने असे अनेक कॅम्प गोरगरीब लोकांसाठी पूर्ण तालुक्यात राबवले जात आहेत. यामध्ये काही अशासकीय संस्था जर मदतीस इच्छुक असतील तर त्यांनी सुद्धा यामध्ये पुढाकार घ्यावा.
>
> **सागर ढवळे, तहसीलदार**



**खरसुंडी येथे राजस्व अभियान अंतर्गत मेळावा संपन्न झाला. यावेळी मेळाव्यास झालेली गर्दी**

यावेळी खरसुंडी मंडळ अधिकारी कमाल मुलाणी , पुरवठा निरीक्षक दादासाहेब पुकळे, मंडळातील सर्व तलाठी, सेतू चालक, महा ई सेवा केंद्र प्रमुख, सीएससी केंद्र प्रमुख, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर, ग्रामसेवक, आदींनी उपस्थिती राहून कामकाज केले. तसेच परिसरातील सर्व शेतकरी बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन अंकी लाभांश बरोबरच भेटवस्तू वाटपामुळे सभासदामध्ये विश्वासार्हता वाढली : गजानन पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना पुरस्कृत सांगली जिल्हा विकास प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेने नेहमी सभासद शिक्षकांना केंद्रस्थानी मानूनच कारभार केला. दोन अंकी लाभांश देऊनही प्रत्येक सभासदाला जीवनोपयोगी आणि दर्जेदार एक भेटवस्तू प्रतिवर्षी देण्याची परंपरा गेली २२ वर्षे संस्थेने जपली. या भेटवस्तू वाटपामुळेच सभासदांमध्ये पतसंस्थेबद्दल प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि कारभाराबद्दल च्या विश्वासार्हतेमध्ये वाढ झाली असल्याचे मत संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक तथा राज्य नेते गजानन पाटील यांनी व्यक्त केले.

सुरुवातीच्या काळात संघटना कार्यकर्त्यावर येणारे दबाव, होणारे खच्चीकरण, हरॅशमेंट आणि न्यायालयीन लढाईमुळे झालेला सुमारे पंधरा लाख रुपयेचा तोटा संस्थापक सभासदांनीच सोसला आणि संघटना कार्यकर्त्यावर विश्वास ठेवून त्यांना बळ दिले म्हणूनच पिशवी रूपातील आपली पतसंस्था १२५ कोटी पेक्षाही अधिक वार्षिक उलाढाल करू लागली, यातील सभासदांचा सिंहाचा वाटा संघटना विसरली नाही. म्हणूनच पतसंस्थेबरोबरच संघटना वाढीकडेही आपण सर्वांनी लक्ष देणे ही काळाची गरज आहे, विशेषतः आजचे सत्कारमूर्ती शाखा सल्लागार यांनी विशेष लक्ष द्यावे असे आवाहन श्री पाटील यांनी केले. भेटवस्तू वाटप आणि शाखा सल्लागार सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

रविवार दि. ९ रोजी आटपाडी येथे कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे माजी चेअरमन टी. के. जावीर होते. पतसंस्थेचे नूतन संचालक अजिनाथ बुधावले आणि पदवीधर शिक्षक संघटना यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

प्रारंभीच कार्यक्रमाचे अध्यक्ष टी. के. जावीर, प्रमुख पाहुणे गजानन पाटील, गटशिक्षण अधिकारी दत्तात्रय मोरे, बाळासाहेब गुरव, माणिक खंडागळे, तालुका अध्यक्ष विलास गळवे, शाखा संचालक अजिनाथ बुधावले, शिक्षक बँकेचे संचालक शरद चव्हाण, सुनील गायकवाड, हणमंत गायकवाड,विजय चव्हाण, संतोष क्षीरसागर, आटपाडी तालुका शिक्षण सेवक पतसंस्थेचे संचालक रसिक सपाटे, संजय काळेल, महेश गोंजारी, सदाशिव सरक, जनार्दन मोटे, विस्तार अधिकारी विजय राजमाने इत्यादी मान्यवरांचासत्कार करण्यात आला.

प्रातिनिधीक स्वरूपात पतसंस्थेने सभासदांना दिलेल्या भेटवस्तूचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. पतसंस्थेच्या आटपाडी शाखा सल्लागारपदी निवड झाल्याबद्दल जगन्नाथ नांगरे, मंगल राजमाने, अनिता कदम, गायत्री चांडवले, हणमंत दबडे, नागेश जावीर, नितीन वाघमारे, जीवन सावंत, विजय पवार आणि प्रवीण कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संघटनेचे मार्गदर्शक बाळासाहेब गुरव, माणिक खंडागळे, शिक्षक बँकेचे संचालक शरद चव्हाण, विलास गळवे, विजय चव्हाण, जीवन सावंत,मंगल राजमाने विजय राजमाने यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



**सांगली जिल्हा विकास प्राथमिक सहकारी शिक्षक पतसंस्थेच्या लाभांश व भेट वाटप प्रसंगी उपस्थित पतसंस्थेचे संचालक मंडळ व सभासद**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखा संचालक आजिनाथ बुधवले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र भोसले तर आभार प्रदर्शन नारायण कदम यांनी केले.

## * संपादकीय *

# हिला बैसवू वैभवाच्या शिरी...

महाराष्ट्र सरकारने गेले दशकभर रखडलेले 'मराठी भाषा धोरण' अखेर मंजूर केले. सरकारच्या या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करतानाच मराठी भाषा, समाज आणि संस्कृती यांच्यासमोर असणाऱ्या आव्हानांचा नेमका अंदाज घेऊन राज्य सरकार या धोरणाचा कृती आराखडा कधी तयार करणार आणि खरोखरच झपाट्याने कामाला कधी लागणार, असा प्रश्न विचारावा लागेल. २०१४ मध्ये हे धोरण तयार करण्यात आले; तेव्हा ते 'पुढील २५ वर्षांसाठी हे धोरण असेल,' असे म्हटले होते. यातील दहा वर्षे तर निघून गेली आहेत.

इंद्रायणी आणि चंद्रभागा यांच्या पात्रांतूनही या काळात बरेच पाणी वाहून गेले आहे. ज्ञानाच्या विस्ताराचा आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याचा वेग जर समजत असता तर 'पुढील २५ वर्षांत मराठी ही ज्ञानभाषा बनवू..' असली वावदूक विधाने कोणी केली नसती. मात्र, तशी ती केली जातात. याचे कारण मराठी भाषा, समाज आणि संस्कृती यांच्या समोरच्या आव्हानांची विक्राळताच सरकारला आणि त्याच्या तज्ज्ञ सल्लागारांना समजलेली नाही. या तीन बाबींचा उल्लेख एकत्र करण्याचे कारण, या तीन गोष्टी परस्परांशी आतड्याने जोडलेल्या आहेत. त्या वेगळ्या नाहीत. त्यामुळे त्यांचा विचारही एकत्रितच करायचा असतो. आज दिवसागणिक मराठीची भूमी चहूबाजूंनी आक्रसत चालली आहे. आधी ती टिकवायला हवी. नंतर गेलेली संपादन करण्यासाठी पावले टाकायला हवीत. त्यानंतर मग पुढची मजल. मराठी समाजाने एकमुखी निर्धार केला तर मराठी भाषा आणि संस्कृतीवरचे बहुमुखी आक्रमण थोपवून ते उलटे फिरवता येईल. त्यासाठी निदान दोन ते तीन दशके कल्पक परिश्रम करावे लागतील. त्यासाठी, दक्षिणेकडील काही राज्यांचे शिष्यत्व पत्करून प्रामाणिकपणे अनेक गोष्टी शिकाव्या लागतील. मराठी भाषा, समाज आणि संस्कृती यांच्या स्वाभिमानाचा अभिनिवेशरहित पण डोळस जागर करावा लागेल. हे काम करण्यासाठी राजकारणाच्या बाहेरचे द्रष्टे सामाजिक व सांस्कृतिक नेतृत्व विकसित व्हावे लागेल. तसे ते होऊ शकते.

महाराष्ट्रातील, भारतातील आणि जगभरात विखुरलेल्या मराठी समाजाच्या दैनंदिन जीवनाला, त्याच्या भाषिक आविष्कारांना, सांस्कृतिक उपक्रमांना आणि आध्यात्मिक तृष्णेला मराठीचा पाझर फोडता येतो का, हे फार मोठे आव्हान आहे. थेटच सांगायचे तर मराठी माणसांच्या निधनानंतर सभागृहांमध्ये पोषाखी 'प्रेअर मीटिंग्ज' का व्हाव्यात? काल-परवा होत किंवा आजही होतात अशी वारकरी सांपद्रायिक भजने का होऊ नयेत? हे टोकाचे उदाहरण वाटले तरी 'बारसे ते बारावे' हे सगळे अस्सल मराठी नको का? मराठी संस्कृतीची जपणूक आणि मराठी भाषेचे संवर्धन यांच्यात अंतराय नाही; ते दोन्ही एकच आहेत, याची पुरेशी जाणीव आव्हानांचा विचार करताना दाखविली जात नाही. ती या निमित्ताने अधोरेखित व्हायला हवी. महाराष्ट्र सरकारने आजवर जे कुऱ्हाडीचे घाव मराठीवर घातले; त्यातला प्रमुख शैक्षणिक धोरणाचा होता. सुदैवाने, नवे शैक्षणिक धोरण मातृभाषांचा पुरेसा सन्मान राखू इच्छिते. महाराष्ट्रात मराठी आणि इंग्रजी माध्यम यांच्यात उभा राहिलेला संघर्ष अनाठायी होता. राज्यातील सर्व शाळकरी मुलांना अगदी पहिलीपासून इंग्रजीचेही ज्ञान दिले असते तर हा संघर्ष या थराला गेलाच नसता. दिवंगत रामकृष्ण मोरे हे शिक्षणमंत्री असताना त्यांना हा पेच बरोबर समजून त्यांनी तसा निकाल घेतला होता. तो हाणून पाडण्यात आला. कोणत्याही भाषेशी वैर न करता स्वभाषा आणि संस्कृतीचे सत्त्व टिकवायचे; हे आपल्याला प्रामुख्याने तमिळनाडूकडून शिकावे लागेल. त्याचप्रमाणे, 'केरळ शास्त्र साहित्य परिषद' अशा संस्थांकडूनही शिकावे लागेल. या संस्थेने मल्याळममधील शिक्षणासाठी, साहित्य प्रसारासाठी सहा दशके अतुलनीय काम केले आहे.

मराठी भाषा आणि संस्कृतीच्या उत्कर्षाचा अनुबंध 'महाराष्ट्र' या राज्याच्या आणि समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षाशी जोडलेला आहे, हे यातले महत्त्वाचे प्रमेय दुर्लक्षित राहू नये. सर्वांगीण म्हणजे परदेशी गुंतवणूक, उद्योग आणि मोठमोठाले महामार्ग नव्हेत. मराठी भाषा आणि समाज यांच्या समन्वित उत्कर्षाचा आलेख पाहायचा तर महाराष्ट्राने 'ज्ञानेश्वरकाळ ते शिवकाळ' तसेच एकोणिसावे शतक पुन्हा डोळसपणे अभ्यासायला हवे. राज्य सरकारने मंजूर केलेल्या धोरणात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे 'आर्टिफिशियल इंटलिजन्स'चा स्वागतार्ह उल्लेख केला आहे. हे व इतरही सगळी आधुनिक तंत्रवैज्ञानिक साधने वापरावीच लागतील. मात्र, ही सर्व साधने असतात आणि त्यांचा उपयोजक 'मराठी भाषक' भक्कम हवा. महाराष्ट्र हा भारताचा अविभाज्य भाग आहेच. मात्र, आपले महाराष्ट्र म्हणून नेमके वैशिष्ट्य, वेगळेपण, शक्ती आणि व्यक्तिमत्त्व काय आहे; याचा शोध मराठी माणसाला लागला की तो आपली भाषा आणि संस्कृती यांची जपणूक स्वत:हून आणि जिवापाड मेहनत घेऊन करेल. 'हिला बैसवू वैभवाच्या शिरी..' हे मग आपसूक घडेल.

# हिटलरी काळाचा तुकडा

डॉल्फ हिटलर आठ नोव्हेंबर, १९२३ रोजी म्युनिचच्या पुत्श बियर हॉलमधे घुसला आणि तिथली एक सभा उधळून लावताना आपण जर्मनीत क्रांती केली आहे, असे त्याने जाहीर करून टाकले. क्रांतीनंतर जर्मनी काय करणार, हेही त्याने सभेत सांगून टाकले. लोकशाही बुडवू, ज्यू-कम्युनिस्ट-विरोधक यांना तुरुंगात घालू, त्यांना मारून टाकू वगैरे. क्रांती झालीच नव्हती. दुसऱ्या दिवशी म्युनिचमधल्या सरकारी इमारती ताब्यात घेण्याचा प्रयत्न हिटलरने केला. तो निष्फळ ठरला. पोलिसांनी झाडलेली गोळी त्याच्यापासून सहा इंचावरच्या सहकाऱ्याला लागली, हिटलर वाचला. त्याला अटक झाली. तुरुंगवास झाला. आठ महिन्यांनी तुरुंगाबाहेर आल्यावर हिटलरने संघटना बांधायला घेतली आणि अनेक निवडणुका लढवत शेवटी ३४ टक्के मतांच्या आधारे जर्मनीचा चॅन्सेलर झाला. पुढे काय झाले ते सांगायला नको. लेखक वोल्कर उलरिच जर्मनीच्या इतिहासाचे मान्यवर अभ्यासक आहेत. बियर हॉल घटनेच्या आठ दिवसांच्या घटनाक्रमावर '१९२३ मधले आठ दिवस' असे स्वतंत्र पुस्तक उलरिच यांनी लिहिले आहे. तर 'जर्मनी १९२३ : हायपरइन्फ्लेशन, हिटलर्स पुत्श अँड डेमॉक्रॅसी इन क्रायसिस' या पुस्तकात १९२३ या वर्षातल्या घटनाचक्राचा वेध लेखकाने घेतला आहे.

तो काळ जर्मनीतील संघर्षमय जीवनाचा होता. लोकशाही अडखळत होती. बहुपक्षीय आघाड्या सरकारे बनवत होत्या. त्यांना अर्थव्यवस्था सांभाळता येत नव्हती. जर्मनीतले मार्क हे चलन कागदाच्या कपट्यापेक्षाही निरर्थक झाले होते. एक डॉलरबरोबर हजारो मार्क अशी स्थिती झाली. जर्मनीत अराजक माजले, राजकीय पोकळी झाली. या पोकळीत हिटलर घुसला. अर्थात, त्यासाठी पुढे दहा वर्षे हिटलरला मेहनत करावी लागली. जर्मनीतल्या या देशी घटनाचक्राचा धावता मागोवा लेखकाने घेतला आहेच. पण त्याहीपेक्षा जर्मनीतल्या या घटना आंतरराष्ट्रीय स्थितीशी कशा जोडल्या गेल्या आहेत, ते दाखवले आहे, सविस्तर.

पहिले महायुद्ध घडवून केलेल्या नुकसानीची भरपाई जर्मनी करू शकत नव्हते म्हणून फ्रान्स आणि बेल्जियमने १९२३ मध्येच जर्मनीवर स्वारी केली. जर्मनीच्या आर्थिक समृद्धीचे केंद्र असलेला रूर हा खाणींचा प्रांत फ्रान्सने काबीज केला. लष्करी कारवाई केली. या कारवाईत जर्मन स्त्रियांवर बलात्कार झाले, नागरिकांवर अत्याचार झाले. जर्मनीत फ्रान्सबद्दलच चिडीची भावना उफाळून आली. जर्मनीतल्या दहशतवादाची मुळे या घटनेत आहेत. फ्रेंच अधिकारी, फ्रेंचधार्जिणे जर्मन-ज्यू पुढारी याच घटनाचक्रात मारले गेले. मारणारे लोक जर्मनीत हुतात्मे झाले. सहा वर्षं आधी रशियात राज्यक्रांती झाली होती. झारशाही उलथवून कम्युनिस्ट राजवट आली होती. कम्युनिस्ट क्रांतीला अत्याचाराची, विरोधकांचा नायनाट करण्याची दाट छटा होती. खूप सामान्य माणसे कम्युनिस्ट अत्याचाराला कंटाळून जर्मनीच्या आश्रयाला आली होती. त्यांना कम्युनिस्ट शैलीची क्रांती जर्मनीत नको होती. पण समांतर पातळीवर जर्मनीतले अनेक पुढारी रशियातल्या कम्युनिस्ट क्रांतीने भारावून गेले होते, तिथला अनुभव न घेता.

मार्क्स जर्मन होता हे त्यांच्या भारावलेपणाचे एक कारण असेल काय? त्यांना जर्मनीत कम्युनिस्ट शैलीची सशस्त्र क्रांती करायची होती. जर्मनीत शस्त्रांचा सुळसुळाट झाला होता. शस्त्रे हा माणसाच्या दैनंदिन पोषाखाचा एक भाग झाला होता. लेखकाने जर्मनी आणि युरोपातल्या घटनांचे विपुल, प्रसंगी समजायला कठीण जाणारे तपशील मांडले आहेत. त्यातल्या घटनांची जोडणी करणे हे वाचकाला थोडे कठीण जाते. परंतु अभ्यासकांना मात्र हे पुस्तक उपयुक्त आहे. जर्मनी समजून घेण्यासाठी लागणारी साधने लेखकाने पुस्तकात दिली आहेत. उलरिच यांनी आधी 'हिटलर : असेन्ट १८८९-१९३९' हे पुस्तक या आधी लिहिले आहे. त्यात हिटलरच्या व्यक्तिमत्त्वावर लेखकाने सविस्तर प्रकाश टाकला आहे. त्या पुस्तकातून हिटलर आणि त्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे जर्मनीचा झालेला प्रवास समजतो. तर 'जर्मनी १९२३' पुस्तकात व्होल्कर उलरिच यांनी, त्या वेळची पत्रे, आठवणी, वर्तमानपत्रातील लेख आणि इतर स्रोतांचा आधार घेऊन अनेक अर्थाने उलथापलथ घडलेल्या 'त्या' बारा महिन्यांचा इतिहास मांडला आहे.

# निवडणूक रोख्यांची देशभरात चर्चा, शिवसेना आणि राष्ट्रवादीला किती कोटी मिळाले?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्टेट बँक ऑफ इंडियाने निवडणूक आयोगाला निवडणूक रोख्यांचा तपशील सादर केल्यावर आयोगाने गुरुवारी रात्री हा तपशील आपल्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला. या माहितीनुसार, प्रादेशिक पक्षांना एप्रिल २०१९ ते जानेवारी २०२४ या कालावधीत निवडणूक रोख्यांद्वारे ५,२२१ कोटी रुपये देणग्यांच्या स्वरूपात प्राप्त झाले. याच काळात एकट्या भाजपला या माध्यमातून याहून ८३९ कोटींनी अधिक म्हणजे ६,०६० कोटी रुपये मिळाल्याचे समोर आले.

निवडणूक आयोगाने खरेदीदार आणि लाभार्थी पक्ष अशा दोन भागांमध्ये ही माहिती प्रसिद्ध केली आहे. काँग्रेसला १,४२१.८६ कोटी रुपये, तर आम आदमी पक्षाला ६५.४५ कोटी रुपयांचा लाभ देणग्यांचा स्वरूपात मिळाला. बहुजन समाज पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि नॅशनल पीपल्स पक्ष या अन्य राष्ट्रीय पक्षांना निवडणूक रोख्यांद्वारे कोणताही निधी मिळालेला नाही.

प्रादेशिक पक्षांमध्ये तृणमूल काँग्रेसला सर्वाधिक निधी रोख्यांद्वारे मिळाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. तृणमूल काँग्रेसला रोख्यांद्वारे १,६०९.५३ कोटी रुपये प्राप्त झाले. ही रक्कम २२ प्रादेशिक पक्षांना मिळालेल्या देणग्यांच्या ३० टक्के आहे. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स आणि गोवा फॉरवर्ड पक्ष यांना रोख्यांद्वारे एक कोटीहून कमी देणग्या मिळाल्या.

महाराष्ट्रातील पक्षांना मिळालेला निधी (कोटी रुपयांत)

- शिवसेना - १५९.३८
- राष्ट्रवादी काँग्रेस - ३१

अन्य पक्षांना मिळालेला निधी (कोटी रुपयांत)

- भारत राष्ट्र समिती - १२१४.७०
- बिजू जनता दल - ७७५.५०
- द्रमुक - ६३९
- वायएसआर काँग्रेस - ३३७
- तेलगू देसम - २१८.८८
- राष्ट्रीय जनता दल ७३.५
- जनता दल (धर्मनिरपेक्ष) - ४३.४०
- सिक्कीम क्रांतिकारी पक्ष - ३६.५
- जनसेना पक्ष - २१
- समाजवादी पक्ष - १४.०५
- जनता दल (संयुक्त) १४
- झारखंड मुक्ती मोर्चा - १३.५ कोटी
- अकाली दल ७.२
- अण्णा द्रमुक - ६.०५
- सिक्कीम डेमोक्रेटिक फ्रंट ५.५

# निवडणूक रोखे हे जगातील सर्वात मोठे खंडणी रॅकेट; राहुल गांधींचा घणाघाती प्रहार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

ठाणे : निवडणूक रोखे देशातील नव्हे तर जगातील सर्वात मोठे खंडणी रॅकेट आहे. सीबीआय आणि ईडी तपास करत नाहीत, ते भाजपची वसुली करतात, असा घणाघाती प्रहार काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. भाजप निवडणूक रोख्यांच्या जोरावर पक्ष फोडतो ही राष्ट्रविरोधी कृती असून राष्ट्रवादी काँग्रेस पैशाने फोडल्याचा आरोप त्यांनी केला. देशात ज्या संस्था अस्तित्वात होत्या, त्या आता भाजप आणि आरएसएसचे हत्यार आहेत, त्यामुळेच हे सर्व घडत असल्याचे राहुल म्हणाले. या संस्थांनी त्यांचे काम केले असते तर हे सर्व घडले नसते. तसेच या सर्व संघटनांनी विचार करावा की एक दिवस भाजपचे सरकार जाईल, मग कठोर कारवाई केली जाईल.

पत्रकार परिषद राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक रोखे म्हणजे कंपन्यांकडून हप्ता घेण्याचा प्रकार आहे. यामध्ये अनेक कंपन्या असून काही कंपन्यांचे नाव येणे बाकी आहे. सर्व संस्थांना भ्रष्टाचार करायला सांगत असून ही पंतप्रधानांची आयडिया आहे. गडकरी किंवा आणखी कोणाची ही आयडिया नाही. महाराष्ट्रात जे दोन तुकडे केले त्याचे पैसे कुठून आले? देशात जिथे जिथे सरकार पाडले त्याचे पैसे कुठून आले? पक्ष फोडण्याचे काम अमित शाह करत आहेत. सीबीआय, एऊ एक्सटॉर्शन करते. शिवसेना, राष्ट्रवादीला याच पैशातून तोडल्याचा आरोप राहुल यांनी केला. सीबीआय आणि एऊ हे आरएसएसचे हत्यार असल्याचा आरोप त्यांनी केला.

भाजप राज्यांमध्ये जी सरकारे पाडत आहे, त्यासाठी पैसा कुठून येतो? भाजपने संपूर्ण राजकीय व्यवस्था ताब्यात घेतली आहे. तपास यंत्रणा आता तपास करत नसून वसुली करत आहेत. यापेक्षा मोठी देशद्रोही कृती असू शकत नाही, असेही ते म्हणाले. राज्यांमधील काँग्रेस सरकारांनी दिलेले करार आणि इलेक्टोरल बाँड्स यांचा काहीही संबंध नाही.

तपास यंत्रणांचा वापर करून कंपन्यांकडून वसुली केली जात आहे, मोठमोठ्या कंत्राटांचा हिस्सा घेतला जात आहे, असे राहुल म्हणाले. कंत्राट देण्यापूर्वी निवडणुकीच्या देणग्या घेतल्या जात आहेत. ही संपूर्ण रचना पंतप्रधान मोदींनी तयार केली आहे. मिलिंद देवरा यांच्याबाबत राहुल गांधी म्हणाले की, देवरा यांनी भाजपमध्ये प्रवेश करणे ही मोठी गोष्ट नाही. मिलिंद देवरा आणि अशोक चव्हाणांनी पक्ष सोडला, पण आमचा पक्ष कायम आहे. हा पैसा वापरून राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष फोडले

# पाऊस पडला तरी लागणार निकाल, सेमीफायनल-फायनलसाठी मंजूरी

## टी-२० वर्ल्डकपसाठी आसीसीचा मोठा निर्णय

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

दुबई: आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात आयसीसीने २ जूनपासून वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० वर्ल्डकपसाठी एक मोठी घोषणा केली आहे. आयसीसी टी-२० वर्ल्डकपमधील सेमीफायनल आणि फायनल मॅचसाठी राखीव दिवसाला मंजूरी दिली आहे. लीग अथावा सुपर-८ फेरीतील मॅच पूर्ण होण्यासाठी दुसऱ्या डावातील फलंदाजी करणाऱ्या संघाच्या किमान ५ ओव्हर झाल्या पाहिजेत. तर नॉकआउट फेरीतील मॅच पूर्ण होण्यासाठी दुसऱ्या डावातील किमान १० ओव्हर झाल्या पाहिजेत.

टी-२० वर्ल्डकपमध्ये सेमीफायनलची पहिली लढत २६ जून रोजी गुयाना आणि दुसरी २७ जून रोजी त्रिनिदाद येथे होईल. अंतिम मॅच २९ जून रोजी बारबाडोस येथे होणार आहे. ग्रुप फेरीतील लढती १ ते १८ जून या काळात तर सुपर ८ फेरीतील लढती १९ ते २४ जून या काळात होणार आहेत.

स्पर्धेची सुरुवात एक जून रोजी अमेरिका आणि कॅनडा यांच्या लढतीने होईल. गेल्या म्हणजे २०२२ च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये इंग्लंडने पाकिस्तानचा पराभव करून विजेतेपद मिळवले होते.

प्रत्येक ग्रुपमधील दोन संघ सुपर ८ मध्ये जातील. त्यानंतर या संघांना प्रत्येकी ४ या प्रमाणे दोन गटात विभागले जाईल. सुपर ८ मधील प्रत्येक ग्रुपमधील दोन संघ सेमीफायनल मध्ये पोहोचतील.

ग्रुप ए मध्ये भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका सारखे संघ आहेत. ग्रुप बी मध्ये इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, नामीबिया, स्कॉटलंड, ओमान. ग्रुप सी मध्ये न्यूझीलंड, वेस्ट इंडीज, अफगाणिस्तान, युगांडा आणि पापुआ न्यू गिनी तर ग्रुप डी मध्ये दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, नेदरलँड आणि नेपाळ या देशांचा समावेश आहे. ९ जून रोजी भारताची लढत पाकिस्तानविरुद्ध होणार आहे. टी-२० वर्ल्डकपसाठी राखीव दिवसांना मंजूरी देण्यासोबत आयसीसीने पुढील म्हणजे २०२६ साली भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० वर्ल्डकपच्या पात्रता प्रक्रियेला मंजूरी दिली आहे.


या स्पर्धेत २० संघांचा सहभाग असेल. ज्यातील १२ संघ ओपोआप पात्र होतील. २०१४च्या वर्ल्डपकमधील ८ संघ आणि भारत व श्रीलंका हे संघ आपोआप पात्र होतील. अन्य दोन संघ हे ३० जून रोजी आयसीसी टी-२० क्रमवारीतील रँकिंगमधील संघ असतील. त्यानंतरच्या जागांसाठी पात्रता फेरीच्या लढती होतील.

# चिडलेले हत्ती जेव्हा धुमाकूळ घालत माणसांच्या जीवावर उठतात...

पश्चिम घाटातील सर्वात शेवटचे राज्य असलेल्या केरळमध्ये हत्ती आणि माणूस यांच्यातील संघर्षात दिवसागणिक वाढ होत आहे. गेल्या काही आठवड्यांमध्ये तब्बल ५ जणांचा जीव हत्तींनी घेतला, त्यात वयस्कर आणि तरुणांचा समावेश आहे. हिंसक झालेल्या हत्तींनी माणसावर असा थेट जीवघेणा हल्ला करणे ही बाब खूपच चिंतेची बनली असल्याने केरळ सरकारने आता मानव-वन्यजीव संघर्षाला 'राज्य आपत्तीचा दर्जा' जाहीर केला आहे. अशा प्रकारच्या आपत्तीला आणि समस्येला असा दर्जा देणारे केरळ हे भारतातील पहिलेच राज्य ठरले आहे.

हा निर्णय सरकारला का घ्यावा लागला?

केरळमध्ये जंगली हत्ती आणि मानव यांच्यातील संघर्ष उग्र बनत चालला आहे. कधी जंगलात, कधी शेतात, कधी रस्त्यात तर कधी गावात; अचानक आणि आक्रमकपणे हत्तींकडून होणाऱ्या हल्ल्यांमुळे नागरिक प्रचंड धास्तावले आहेत. गेल्या ३-४ आठवड्यातच तब्बल ५ जणांचा बळी हत्तींनी घेतला. त्यामुळे चिडलेल्या नागरिकांनी थेट कायदाच हातात घेतला. अखेर ही परिस्थिती हाताळण्यासाठी या समस्येला 'राज्य आपत्तीचा दर्जा' देऊन राज्य सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे.



केरळचा निम्माहून अधिक भूभाग वनाच्छादित आहे. हत्ती-मानव संघर्षाचे प्रसंग नेहमीचेच! अवघ्या तीन वर्षात जवळपास ७० जणांचा बळी, त्याशिवाय शेतपिकांची हानी, मालमत्तेची हानी हे वेगळेच. घटते जंगल, खाद्याची कमतरता, वाढता मानवी हस्तक्षेप, पीक पद्धतीतील बदल, पशुपालनातील वाढ, रस्त्यांसह विविध पायाभूत सुविधांचा विस्तार, परदेशी वृक्षांची लागवड, निवाऱ्यातील असुरक्षिततेची भावना यामुळे हत्ती आक्रमक झाले आहेत. वायनाड, पलक्कड, कन्नूर आणि इडुक्की हे चार जिल्हे हत्ती-मानव संघर्षाने सर्वाधिक ग्रस्त आहेत. साडेतीन हजारांहून अधिक असलेली हत्तींची संख्या गेल्या ६-७ वर्षात निम्म्यावर आली, मात्र तरीही प्रश्न गंभीर झाला आहे.

सर्वसाधारणपणे वन्यप्राण्यांशी संबंधित प्रश्न वनविभागाकडूनच हाताळले जातात. त्यासाठी वन्यजीव संरक्षण कायदा वापरला जातो. केरळमध्ये चीफ वाईल्डलाईफ वॉर्डन हा एकमेव अधिकारी आहे जो यासंबंधी निर्णय घेतो. हत्तींना बेशुद्ध करणे, त्यांना पकडणे, त्यांच्या हत्येची परवानगी देणे यासारख्या निर्णयांना त्यामुळे उशीर होत असल्याची ओरड आहे. या घटनांना राज्य आपत्तीचा दर्जा देण्यात आल्याने आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत या समस्येची हाताळणी होईल.

केवळ वनविभागाऐवजी स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती निर्णय घेईल. या समितीत वनविभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिस, अग्निशमन विभाग अशा विविध विभागांचा समावेश असतो. ही समिती स्थानिक पातळीवर जलद निर्णय घेईल. नुकसानभरपाई देणे असो की हत्तींना अटकाव करणे, हुसकावून लावणे, त्यांना बेशुद्ध करणे किंवा त्यांना जेरबंद करणे हे सारेच निर्णय ही समिती घेईल. राज्य पातळीवर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्य आपत्ती व्यवस्थापन समिती निर्णय देईल.

हत्ती-मानव संघर्षाच्या प्रश्नावर तात्पुरत्या पण प्रभावी उपायासाठी हा निर्णय योग्य ठरेल. पण, कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी नाही. त्यामुळे त्यादृष्टीनेही सरकारने पावले टाकणे आवश्यक आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' हाच निसर्गाचा नियम आहे. आपणही जगा आणि इतरांनाही जगू द्या, या नियमाचाच मानवाला विसर पडला आहे. यातूनच हत्तींशी द्वंद्व सुरू आहे. ते थांबवायचे असेल तर केवळ सरकारी किंवा प्रशासकीय उपाय करून चालणार नाही. सामाजिक बदलही करावे लागतील. त्याची तयारी सर्वांनीच करायला हवी. अन्यथा गजान्त लक्ष्मीचा कोप अटळ आहे.

# एक भावजय विरोधात, दुसरी साथीला, सुप्रिया सुळेंसाठी रोहित पवारांच्या मातोश्री मैदानात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बारामती : बारामतीत नणंद विरुद्ध भावजय असा लोकसभेचा सामना रंगणार आहे. खासदार सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी ही लढत असेल. यंदा एका भावजयीने हात सोडल्याने नणंदेपुढे मोठे आव्हान उभे राहिले असताना दुसरी भावजय त्यांच्या मदतीला धावली आहे. आमदार रोहित पवार यांच्या मातोश्री तथा ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या विश्वस्त सुनंदा पवार या सुळे यांच्या प्रचारात उतरल्या आहेत. इंदापूर तालुक्यातून त्यांनी प्रचार सुरु केला आहे.

निवडणूक कोणतीही असो, त्या उमेदवारासाठी संपूर्ण पवार घराणे प्रचारात उतरल्याचे यापूर्वी मतदारांनी पाहिले आहे. यंदा या गोष्टीला पहिल्यांदाच छेद जातो आहे. कुटुंबातील ही लढाई कोणत्याही पवारांसाठी सोपी राहिलेली नाही. परंतु सध्याचे गणित बघितले तर पवारांशी फारत घेतलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणात सांगितलेल्या बाबींचा प्रत्यय येऊ लागला आहे. त्यांच्या पत्नी व दोन मुलांव्यतिरिक्त पवार कुटुंबातील कोणीही त्यांच्या पाठीशी नसल्याचे दिसून येऊ लागले आहे.अजित पवार यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांनी काकांची साथ सोडत आत्याच्या प्रचाराला वाहून घेतले. पवार कुटुंबात सर्वात प्रथम ते सुळे यांच्यासाठी मैदानात उतरले. आमदार रोहित पवार हे शरद पवार यांच्यासोबत आहेत. परंतु अद्याप त्यांनी बारामतीच्या मैदानात हजेरी लावलेली नाही. त्यांच्या मातोश्री सुनंदा पवार यांनी मात्र आता थेट भूमिका घेत खासदार सुळे यांचा प्रचार सुरु केला आहे. आपल्या जाऊबाई विरोधात त्या आता प्रचार करत असल्याची स्थिती आहे.

सुनंदा पवार या ट्रस्टच्या विश्वस्त आहेत. शारदानगर महाविद्यालयासारखी मोठी संस्था त्यांच्या हाती आहे. शारदा महिला संघाच्या माध्यमातून त्या गेली अनेक वर्षे बारामतीसह राज्यात कार्यरत आहेत. मुली, महिलांसाठी आरोग्यविषयक अनेक उपक्रम त्यांनी राबविले आहेत. भीमथडीच्या माध्यमातून महिला बचत गटांचे संघटन, त्यांना हक्काची बाजारपेठ मिळवून दिली आहे. बारामती, दौंड, पुरंदर व इंदापूर तालुक्यात त्यांचा लोकसंपर्क दांडगा असून त्यांनी आता भेटीगाठींना सुरुवात केली आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)




# नितळ त्वचेसाठी...

मुलायम, तजेलदार त्वचा प्रत्येकालाच हवीहवीशी वाटते. दैनंदिन आयुष्यात केलेल्या छोट्याशा बदलांमुळे आपण निरोगी त्वचा मिळवू शकतो. त्यातच सकाळी उठल्यानंतर काही गोष्टी केल्याने नितळ त्वचेसोबतच बुद्धीही तल्लख होऊ शकते. यासाठी सकाळी उठल्यावर नेमकं काय करायला हवं याविषयी...

* सकाळी दात घासणं, तोंड धुणं यांसारख्या क्रिया केल्यानंतर तुम्ही मेडिटेशन म्हणजे ध्यानधारणा करू शकता. यामुळे तुम्हाला मन:शांती लाभेल. ताण कमी होईल. याचे परिणाम तुमच्या त्वचेवरही दिसू लागतील.



मेंदूलाही चालना मिळेल.

लाईफस्टाईल

* त्वचेचा तजेला दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर सकाळी तुम्हाला पाच मिनिटं वेळ काढावा लागेल. त्यासाठी बर्फाचे दोन तुकडे घ्या. हळूवारपणे संपूर्ण चेहऱ्यावर घासा. फार गार वाटत असेल तर बर्फाचे तुकडे रूमालात गुंडाळून चेहऱ्यावर फिरवा.

* डोळं बंद करा. पापण्यांलगत तसंच डोळ्यांच्या खालच्या भागावरही हलक्या हातांनी बर्फ फिरवा. सायनसचा त्रास असेल तर हा उपाय टाळा.

# का वेगाने वाढताहेत डोळ्यांचे विकार?

**संगणकाच्या आणि मोबाईलच्या अतिवापराच्या युगात डोळे कोरडे पडण्याच्या आजारात वाढ झाली आहे. उन्हाळ्यात तर डोळ्यांच्या आजारांमध्ये मोठी वाढ झाल्याचं दिसतं. डोळे कोरडे पडण्याचा आजार मोठ्या प्रमाणात पसरत चालला आहे. यामुळे संगणकावर काम करून उठल्यानंतर लांबचे चेहरे धुरकट दिसणं, टीव्ही पाहताना अस्पष्ट दिसणं, अशी लक्षणं दिसतात. डोळ्यांमध्ये अश्रू नीट तयार न झाल्याने असं घडतं.**


वाढत्या तापमानाच्या झळा असह्य झाल्यामुळे लोक बाहेर कमी प्रमाणात पडत असले तरी उष्म्याचे इतर दुष्परिणाम सध्या जाणवत आहेत. विविध प्रकारच्या आजारांनी डोकं वर काढलं असून त्यातच डोळ्यांच्या आजारांची भर पडली आहे. उन्हाळा हा नेहमीच डोळ्यांच्या आजारांचा काळ असतो. या काळात डोळे येण्याचा आजार सर्वसामान्य आहे. याखेरीज डोळे लाल होणं, चुरचुरणं हेही घडत असतं. मात्र अलीकडे याच्या जोडीला मोबाईलचा अतिवापर आणि संगणकावरची दीर्घ काळाची कामं भर घालत आहेत आणि त्यामुळे डोळे कोरडे पडण्याचा आजार मोठ्या प्रमाणात पसरत चालला आहे. डोळे कोरडे पडल्यामुळे संगणकावर काम करून उठल्यानंतर लांबचे चेहरे धुरकट दिसणं, टीव्ही पाहताना अस्पष्ट दिसणं, दूरवर पाहताना त्रास होणं अशी लक्षणं दिसतात. याचं कारण असतं डोळ्यांमध्ये अश्रू व्यवस्थितपणे तयार न होणं.

संगणकावर काम करत असताना अधूनमधून ठरावीक २०-२५ मिनिटांच्या कालांतरानं दूरवर नजर टाकणं अनेकांना शक्य होत नाही. कामात व्यत्यय येतो म्हणून अनेकजण सलग चार-पाच तास संगणकावर काम करत राहतात. त्यामुळे काम चांगलं होतं, मात्र शरीरावर दुष्परिणाम होतात. डोळे दुखणं, डोकं दुखणं, अंगदुखीबरोबर डोळे कोरडे पडल्यामुळे काही काळ धूसर दिसण्याचा त्रास सहन करावा लागतो. डोळे कोरडे पडल्यामुळे लवकर थकवा येतो. डोळे चुरचुरू लागतात. डोळ्यांमध्ये टोचल्यासारखं वाटू लागतं. याच दरम्यान अनेकांना डोळ्यांच्या पापण्यांवर सूज येण्याचा त्रास होतो. याला स्टाय असं म्हणतात. शिवाय ॲलर्जी आणि पिंगेकुला किंवा टिरीगिअम यांचा त्रासही सहन करावा लागतो. या आजारात डोळ्यांमध्ये गुलाबी आणि त्रिकोणी आकाराच्या पेशींची वाढ होते. सध्या ॲलर्जी आणि टेरेगिअमचंही प्रमाण डोळे कोरडे पडण्याप्रमाणेच वाढलं आहे.

डोळ्यांचे विकार होण्यास प्रामुख्यानं धूळ कारणीभूत असते. याखेरीज परागकण, धूर, सौंदर्यप्रसाधनं, काही झाडं किंवा बुरशी यांच्यामुळे डोळ्यांना ॲलर्जीचा त्रास होऊ शकतो. उन्हाळ्यात हे प्रमाण वाढतं, कारण उन्हाळ्यात शरीरातलं पाण्याचं प्रमाण कमी होतं. काही रुग्णांमध्ये योग्य काळजी घेतली न गेल्यास उष्माघातापर्यंतचे आजारही या काळात झाल्याचं दिसतं. शरीरातलं पाणी कमी झालं की साहजिकच डोळ्यांवरही परिणाम होतो आणि डोळे कोरडे पडतात. दृष्टीचा विचार करता अश्रूंचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. नेहमीच डोळ्यांमध्ये अश्रू किंवा ओलावा असणं ही डोळे निरोगी राहण्यासाठीची प्राथमिक गरज आहे. कोणतीही गोष्ट स्पष्ट दिसू शकते. अश्रूंमध्ये पाणी, तेल, म्युकस आणि ॲंटीबॉडीज असतात. म्युकसमुळे पाणी सर्वत्र पसरतं तर तेलामुळे घर्षण कमी होतं. ॲंटीबॉडीज आणि खास प्रथिनांमुळे डोळ्यांचा संसर्गापासून बचाव केला जातो. अश्रुग्रंथी या खास ग्रंथीतून हे घटक पदार्थ बाहेर पडतात. डोळ्याच्या पृष्ठभागाला अश्रू थंडावा मिळवून देतात. दर वेळी पापण्यांची उघडझाप झाली की अश्रू डोळ्यांच्या वरच्या बाजूला सरकतात आणि नाकाच्या मागच्या बाजूला जातात.

काही रुग्णांमध्ये वाढत्या वयामुळे अश्रू निर्माण करण्याची प्रक्रिया मंदावते. पापण्या डोळ्यांवर लोंबकळल्याप्रमाणे पडतात. अशा वेळी अश्रू निर्माण होण्यात अडथळा येतो. भरपूर वारा असलेल्या ठिकाणी फिरणं, विमानप्रवास या गोष्टीही डोळे कोरडे होण्याच्या प्रमाणात वाढ करतात. याखेरीज गॉगलचा वापर न करता उन्हाळ्यात दुचाकी चालवणंही घातक ठरतं. ऑटोइम्युन डिसिजेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजारांमध्ये रोगप्रतिकारक्षमताच शरीराच्या काही अवयवांवर हल्ला करते. संधीवाताच्या काही प्रकारांमध्ये आणि जोग्रेन्स सिंड्रोमसारख्या काही आजारांमध्ये हे घडतं. याखेरीज मोतीबिंदूची शस्त्रक्रिया किंवा लॅसिक अगर पीआरके या शस्त्रक्रियांचाही हा दुष्परिणामही असू शकतो. अशा शस्त्रक्रियांच्या वेळी अश्रूनिर्मितीसाठी सहाय्य करणाऱ्या मज्जातंतूंना दुखापत होण्याची शक्यता असते. याखेरीज डोळ्यातल्या तेलाचं प्रमाण कमी झालं असेल तर डोळ्यांना पुरेसा ओलावा मिळण्याआधीच तुमचे अश्रू बाष्पीभवन होऊन सुकून

आरोग्य विशेष



जातात आणि त्यामुळे डोळे कोरडे पडू शकतात. अशा वेळी डोळ्यांच्या बुब्बुळांवर साचलेल्या कोरड्या तैलपेशी डॉक्टर काढून टाकतात.

अश्रूनलिकेला संसर्ग झाला तरी डोळ्याचे विकार होतात. अश्रूनलिका ही नाकाच्या आतल्या भागाला डोळ्यांच्या पापण्यांशी जोडणारी नलिका असते. यामुळे काही वेळा भरमसाठ अश्रू निर्माण होतात, डोळे लाल होतात, सुजतात. यासाठी ॲंटिबायोटिक्सचा उपचार केला जातो. काही वेळा छोटी शस्त्रक्रियाही करावी लागते. डोळ्याच्या कोणत्याही आजारासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणं अत्यंत महत्त्वाचं असतं. लहान मुलांना ॲलर्जी येते, तिला स्प्रिंक कटार असं म्हणतात. अशा आजारांमध्ये डोळ्यांना खाज सुटली तर खाजवू नये. अन्यथा, डोळे आणखी लाल होतात. ॲलर्जी कमी करण्यासाठी डॉक्टरांनी सुचवलेली औषधं डोळ्यांमध्ये टाकावीत. मात्र परस्पर औषधांच्या दुकानातून स्वतःच्या जबाबदारीवर आणलेल्या औषधांमध्ये काही वेळा स्टेरॉइडचा वापर असलेली औषधं असू शकतात. त्यांचा वापर डॉक्टरी सल्ल्याशिवाय केला गेला तर घातक ठरतो.

कृत्रिम अश्रू निर्माण करणारी आणि सहसा थेंबांच्या स्वरूपात असलेली औषधंही या विकारात उपयुक्त ठरतात. यापैकी काही औषधांमधली रसायनं कालांतरानं काम करणं बंद करतात आणि निरुपयोगी ठरतात. यासाठी पर्यावरणपूरक औषधं वापरण्याचा सल्ला दिला जातो. मात्र प्रत्येक रुग्ण वेगळा असतो. त्यामुळे आपल्या डॉक्टरच्या सल्ल्यानेच ही औषधं वापरणं ही या आजारावर मात करण्याची गुरुकिल्ली आहे. याखेरीज आठवड्यातून एखादा दिवस डोळ्यांना काहीही काम करू न देता आराम देणं उपयुक्त ठरतं. डोळ्यांवर काकड्यांच्या चकत्या ठेवण्यानंही थंडावा मिळतो. मात्र नेमकं सुट्टीच्या दिवशी टीव्ही पाहण्याचं प्रमाण वाढल्याचं दिसतं. त्यामुळे या सवयीला आळा घालणंही महत्त्वाचं आहे.

# अल्झायमर की डिमेंशिया?

अल्झायमर आणि डिमेंशिया या दोन व्याधींची नावं आपण बरेचदा ऐकतो. हे दोन्ही मेंदूशी संबंधित विकार असून यात रुग्णाच्या स्मृतीवर परिणाम होतो. त्यामुळे हे दोन्ही विकार आपल्याला सारखेच वाटतात. स्मृतिभ्रंशाचा विकार जडलेले रुग्ण, त्यांचे कुटुंबिय तसंच सर्वसामान्यांसाठीही या दोन्ही विकारांच्या लक्षणांमधला फरक गोंधळात टाकणारा असतो. अल्झायमर आणि डिमेंशिया या दोन विकारांमधला नेमका फरक आपण समजून घेऊ या.

डिमेंशिया हा आधी उल्लेख केल्याप्रमाणे मेंदूविकार आहे. याचा रुग्णाच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होतो. डिमेंशिया झालेल्या माणसाला संवाद साधताना तसंच दैनंदिन कामं करताना अडथळे येतात. दुसरीकडे अल्झायमर हा डिमेंशियाचाच एक भाग असून स्मृती, भाषा आणि विचार यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या मेंदूच्या विविध भागांवर तो प्रभाव टाकतो. डिमेंशिया हा विकार नाही तर व्याधी म्हणजे सिंड्रोम आहे. एखाद्याचं नाव किंवा गाडी कुठे पार्क केली आहे हे विसरण्यापुरता डिमेंशिया मर्यादित नाही. ही व्याधी जडलेल्या रुग्णाला अनेक आघाड्यांवर लढावं लागतं. बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागतं.

खास बात

अशा रुग्णांना संवाद आणि बोलताना अडचणी येतात. स्मृतीवर परिणाम होतो. एकाग्रता आणि लक्ष केंद्रित करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. एखाद्या गोष्टीचं आकलन करताना त्रास होतो. डोळ्यांसमोर घडणाऱ्या घटना पटकन लक्षात येत नाहीत.

अल्झायमर हा डिमेंशियाचा सर्वसाधारणपणे आढळणारा प्रकार आहे. डिमेंशिया जडलेल्या ६० ते ८० टक्के लोकांना अल्झायमर असतो. काळानुसार अल्झायमरची तीव्रता वाढत जाते. अल्झायमरमध्ये मेंदूत प्रथिनं(प्लाक) आणि फायबर्स( टॅंगल्स) तयार होतात. यामुळे नसांना मिळणाऱ्या संदेशांमध्ये अडथळे येतात. अंतिमत: नसांच्या पेशी नष्ट व्हायला सुरुवात होते. या आजाराच्या सुरूवातीला विस्मरणाची समस्या सौम्य स्वरूपाची असते. मात्र नंतर ती वाढत जाते.



विस्मरण, प्रश्न हाताळताना अडचणी येणं, दैनंदिन कामांमध्ये अडथळे जाणवणं, वेळ आणि स्थळ यांच्यात गोंधळ उडणं, दृष्टी अधू होणं, बोलताना शब्दांचा ताळमेळ न बसणं, वस्तू जागच्या जागी ठेवणं, निर्णयक्षमता कमी होणं, काम तसंच सामाजिक जीवनातून अंग काढून घेणं, व्यक्तिमत्त्व आणि स्वभावात बदल होणं ही अल्झायमरची लक्षणं आहेत. त्यातही भीती, गोंधळ, अस्वस्थता, नैराश्य अशाप्रकारचे बदल या रुग्णांच्या स्वभावात दिसून येतात.

अल्झायमर बरा होऊ शकत नाही. या विकारामागे अनुवांशिक कारणं असतात. जीवनसत्त्वांची कमतरता किंवा काही औषधांच्या सेवनामुळे विस्मरणाची समस्या उद्भवली तर ती बरी होऊ शकते. डॉक्टर अल्झायमरचं निदान अचूकपणे करू शकत नाहीत. त्यातच औषधांनी हा विकार बरा होत नाही. मात्र स्वभावातले बदल, विस्मरण, नैराश्य, झोपेच्या चक्रातले बदल अशा लक्षणांवर नियंत्रण मिळवता येतं.

## सकाळचा झटका ठरतो घातक!

नवसंशोधन



सकाळी येणारा हृदयविकाराचा झटका रात्रीच्या तुलनेत अधिक तीव्र स्वरूपाचा असतो, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. त्या दृष्टीने केलेल्या संशोधनाचा तपशील त्यांनी जाहीर केला आहे. 'ट्रेंड्स इन इम्युनॉलॉजी' या जर्नलमध्ये याबाबतचं संशोधन प्रसिद्ध झालं असून विविध प्रकारच्या ॲलर्जींपासून हृदयविकारापर्यंत अनेक विकार दिवसातल्या कोणत्या वेळी अधिक तीव्र स्वरूप धारण करू शकतात, हे यात नमूद करण्यात आलं आहे. या संशोधनात शास्त्रज्ञांनी उंदरांवर काही प्रयोग केले. यात सरक्याडिअन ऱ्हिदम्स आणि रोगप्रतिकारक शक्तीचा प्रतिसाद यातला संबंध तपासण्यात आला. या संशोधनाचा लाभ विविध उपचार तसंच चाचण्यांमध्ये होईल, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

## असे घासा दात...

दंतारोग्य

तोंडाचं आरोग्य उत्तम राखण्यासाठी दिवसातून दोन वेळा दात घासणं गरजेचं आहे. पण फक्त दात घासून भागत नाही तर आपण ते किती वेळ आणि कशा पद्धतीने घासत आहोत यावर बरंच काही अवलंबून असतं. प्रत्येक वेळी दात किमान दोन मिनिटं घासणं गरजेचं आहे. दोन मिनिटं फार वाटत नसली तरी प्रत्यक्षात दात घासताना दोन मिनिटं होतातच असं नाही. त्यामुळे मोबाईलवर टायमर लावा. एखादं गाणं लावून दात घासा. दोन मिनिटं झाल्यावर थांबा. ब्रशचा फार दबाव दातांवर टाकू नका. अतिरिक्त दाबामुळे दातांच्या वरच्या थराचं संरक्षण कमी होऊन हिरड्यांमधून रक्त येऊ शकतं. दात नियमितपणे घासणं गरजेचं आहेच पण ते नेमक्या पध्दतीने घासले जाणंही महत्वाचं आहे.



# ...म्हणून हाडं होतात ठिसूळ



हाडांच्या आरोग्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. ठराविक वयानंतर हाडं ठिसूळ होऊ लागतात. आपल्या काही चुकीच्या सवयी याला कारणीभूत ठरतात. हाडांचं आरोग्य धोक्यात येण्यामागची कारणं जाणून घेऊ या.

आपण कुठे चुकतो?

* हाडांच्या बळकटीसाठी ड जीवनसत्त्व गरजेचं असतं. कोवळं ऊन ड जीवनसत्त्वाचा प्रमुख स्रोत आहे. या जीवनसत्त्वांमुळे हाडांना संरक्षण मिळतं. तसंच कॅल्शियम शरीरात शोषलं जायला मदत होते. मात्र कोवळ्या उन्हात न गेल्याने हाडांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

* हालचालीमुळे हाडं बळकट होतात. व्यायामामुळे फक्त स्नायूच मजबूत होत नाहीत तर हाडांची ताकदही वाढते. व्यायामाचा अभाव, बैठी जीवनशैली हाडांना मारक ठरते.

* धूम्रपान ही हाडांच्या दृष्टीने घातक ठरणारी सवय. धूम्रपानामुळे ऑस्टिओपोरोसिसचा धोका वाढतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे.

* मद्यपान आणि कार्बनयुक्त पेयंही हाडांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक टरतात. अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे हाडांना आवश्यक असणाऱ्या हार्मोन्सच्या निर्मितीवर परिणाम होतो. शिवाय शरीर कॅल्शियम योग्य पद्धतीने शोषून घेऊ शकत नाही.

# लाभ गोमुत्राचे

गोमुत्राचं नाव काढल्यावर आपण नाक दाबत असलो तरी त्याच्या औषधी गुणधर्मांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. गोमुत्रातल्या गुणकारी घटकांमुळे गंभीर आजारही बरा होत असल्याचा दावा करण्यात येतो. गोमुत्राचं सेवन बरंच लाभदायी ठरू शकतं. गोमुत्रात जंतूविरोधी गुणधर्म असतात. त्यामुळे गोमुत्रामुळे विविध प्रकारच्या जंतूंचा नाश होतो. जंतूंमुळे निर्माण होणारे आजार यामुळे बरे होऊ शकतात.



आयुर्वेद आणि विकार

आयुर्वेदानुसार वित्त, वात आणि कफ दोषांचं असंतुलन विविध विकारांना कारणीभूत ठरतं. या त्रिदोषांना नियंत्रणात ठेऊन आजार बरे करण्याची क्षमता गोमुत्रात असते. त्यामुळे याच्या नियमित सेवनावर भर देण्यात आला आहे.

यकृताचं आरोग्य टिकवून ठेवण्यात गोमुत्राची महत्त्वाची भूमिका असते. यकृताच्या कार्यात बिघाड झाला तर अनेक विकारांना निमंत्रण मिळतं. मात्र गोमुत्रामुळे यकृताला बळ मिळतं आणि त्याचं कार्यही सुधारतं.


गोमुत्रात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म आहेत. गोमुत्राचं नियमित सेवन केलं तर शरीराचा व्याधींपासून बचाव होतो. जंतूंशी लढण्यासाठी शरीर सक्षम बनतं.

गोमुत्रात नैसर्गिक खनिजं मोठ्या प्रमाणावर असतात. शरीरातल्या खनिजांची कमतरता भरून काढणं यामुळे शक्य होतं. गोमुत्रातून शरीराला आवश्यक ती पोषणमूल्यं मिळतात.

## डीआरच्या वेळेत निदानासाठी...

डोळ्यांचं आरोग्य

डायबेटिक रेटिनोपॅथीचं (डीआर)निदान वेळेत झालं नाही तर कायमस्वरूपी अंधत्व येण्याचा धोका वाढतो. त्यामुळे मधुमेहींनी डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. रेटिनाच्या प्रभावी प्रतिमा मिळवण्यासाठी स्मार्टफोनचा प्रभावीपणे वापर करता येतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून डायबेटिक रेटिनोपॅथीचं वेळीच निदान करता येणार आहे. यासाठी स्मार्टफोन अधिक सक्षम करण्यावर शास्त्रज्ञांचा भर आहे. मधुमेहींच्या डोळ्यांच्या सर्वसाधारण तपासणीतून काही बाबी लक्षात येत नाहीत. मात्र नव्या तंत्रज्ञानामुळे हे अडथळे दूर होतील.



## का खावा मुळा?

आजीबाईचा बटवा

मुळा अनेक विकारांवर लाभदायी ठरतो. यातल्या काही औषधी घटकांमुळे कॅन्सरला प्रतिबंध होऊ शकतो. रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचं काम मुळा करतो. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी मुळा खायला हवा. यातल्या पोटॅशियममुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात रहायला मदत होते. सर्दी-खोकला झाला असेल तर आहारात मुळ्याचा समावेश करावा. मुळ्यात कफ दूर करणारे गुणधर्म असतात. बद्धकोष्ठतेची समस्या असणाऱ्यांनी मुळा खावा. यात फायबरचं प्रमाण अधिक असल्यामुळेट पचनक्रिया सुरळीत होते. आतड्यांचं आरोग्य राखण्यातही मुळा महत्त्वाची भूमिका बजावतो. मूत्रपिंडासाठीही मुळा लाभदायी ठरतो.



# स्नायू आकुंचन का पावतात?

स्नायूंमध्ये गोळे येणं ही सर्वसाधारण बाब आहे. रात्रीच्या वेळी पोटरीलगतचे स्नायू अचानक आकुंचन पावतात. त्या भागात असह्य वेदना जाणवतात. काही काळानंतर परिस्थिती सर्वसामान्य होते. अनेकांना वारंवार हा त्रास जाणवतो. यामुळे झोपेवरही परिणाम होतो. स्नायू आकुंचन पावण्याची ही समस्या ( मसल स्पॅम्स) जीवनसत्त्वं तसंच काही पोषण मुल्यांच्या कमतरतेमुळे निर्माण होते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. डी ३ या जीवनसत्त्वाची कमतरता अनेकांमध्ये आढळते. रात्रीच्या वेळी स्नायू आकुंचन पावण्यामागचं हे महत्त्वाचं कारण ठरू शकतं. त्यातच डी ३ हे जीवनसत्त्व शरीरातल्या विविध हार्मोन्सच्या निर्मितीवर प्रभाव टाकतं. त्यामुळे याची कमतरता आरोग्याला मारक ठरू शकते.

स्नायू आकुंचन पावण्याच्या इतर काही कारणांबद्दल बोलायचं तर झिंक या खनिजाची कमतरताही याला कारणीभूत ठरू शकते. शरीराला झिंकची अगदी कमी प्रमाणात गरज असते. पूर्णधान्य, कठीण कवचाची फळं, विशिष्ट बिया आणि हिरव्या पालेभाज्या झिंकचे प्रमुख स्त्रोत आहेत. ब १२ हे जीवनसत्त्व मेंदूच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम करतं.



व्याधी विचार

शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास स्नायू आकुंचन पावतात. ही समस्या उद्भवत असेल तर भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे.

शरीराला नीट आराम मिळाला नाही तरी स्नायू आकुंचन पावतात. रात्रीची शांत झोप घेण्यावर आपण भर द्यायला हवा. तसंच शरीराला योग्य प्रमाणात विश्रांतीही मिळायला हवी. शरीरातलं मॅग्नेशियमचं प्रमाण कमी झालं तरी हा प्रश्न निर्माण होतो. चहा, कॉफीचा अतिरेक, चुकीचा आहार, पाण्याचं कमी प्रमाण यामुळे शरीरातलं मॅग्नेशियम कमी होऊ शकतं.

अनियंत्रित मधुमेह, हायपोथायरॉइडिझम, अतिरिक्त मद्यपान या कारणांमुळेही स्नायू आकुंचन पावतात.

पोटरीचे स्नायू योग्य पद्धतीने ताणले गेले नाहीत तरी ते टणक होतात. त्यामुळे नियमित योगासनं, शारीरिक हालचाल, शरीरा ताणण्याचे व्यायाम यामुळेही तुम्हाला आराम मिळू शकतो.

संतुलित आहार, पाण्याचं प्रमाण वाढवणं, विश्रांती घेणं, नियमित व्यायाम या उपायांनी तुम्ही ही समस्या सोडवू शकता.

# मुंबईत महिला सुरक्षा अभियान राबवावे:मुख्यमंत्री

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई-नोकरी, व्यवसाय, शिक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लाखो महिला पहाटेपासून घराबाहेर पडतात. या महिलांना ज्याप्रमाणे आपण रोजगार देतो, त्याचप्रमाणे त्यांना सुरक्षा देण्याची जबाबदारी देखील आपली आहे. त्यामुळे मुंबई महानगरात महिला सुरक्षा अभियान राबविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिकेला दिले आहेत. यासाठी महानगरपालिका आणि मुंबई पोलिस यांनी एकत्रित येत अभियान राबवावे, असेही त्यांनी नमूद केले.

महिला सशक्तीकरणाच्या उपक्रमांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाने बळकटी दिली आहे. महाराष्ट्र शासनाकडूनही महिला सशक्तीकरणासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेने देखील महानगरातील महिलांना स्वावलंबी आणि सक्षम बनविण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून विविध योजना अंमलात आणल्या आहेत. यापैकी मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात काही महिला बचत गटांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यासह तब्बल ७० हजार आकांक्षित भगिनींच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) अनुदान जमा करण्यात आले. तसेच दिव्यांग स्वयंरोजगार योजना, पीएम स्वनिधी, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या लाभार्थ्यांनाही अनुदान वाटप करण्यात आले.

पालिका ही महिला बचत गटांच्या माध्यमातून मुंबई महानगरातील महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करीत असून गृहउद्योगांच्या माध्यमातून मुंबईतील लाखो महिला आज स्वत:च्या पायावर उभ्या असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेद्वारे प्रत्येक बचत गटाला पालिका एक लाख रुपये देणार आहे. महानगरपालिकेने हाती घेतलेल्या विविध योजना आणि उपक्रमांमध्ये केवळ महिलाच नव्हे तर दिव्यांग, तृतीयपंथी या सर्वांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यासाठी अभ्यासिका, महिलांसाठी वसतिगृह या सुविधा देखील खूप महत्वपूर्ण आहेत. आकांक्षित महिला योजनेतून मिळणारा धनलाभ हा थेट महिलांच्या बँक खात्यात जमा झाल्याची माहिती त्यांनी दिली. शिवाय हा भाऊ या सर्व भगिनींच्या पाठीशी सदैव उभा आहे अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी मनोगतातून दिली.

नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत आकांक्षित महिला सक्षमीकरण योजना सुरू झाली आहे. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी विविध योजना अंमलात आणल्या जात असून केंद्र आणि राज्य शासनाच्या प्रयत्नांमुळे मुंबईतील महिला अधिकाधिक सक्षम होत आहेत.


बचत गटातील महिलांच्या कष्टाला कौशल्याची जोड देणे काळाजी गरज आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त म्हणजेच ३१ मे रोजी संपूर्ण मुंबई महानगरात किमान कौशल्य विभागामार्फत 'पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर महिला कौशल्य विभाग' सुरू करण्यात येणार आहे. या विभागात महिन्यातील तीन दिवस बचत गटांच्या महिला सदस्यांसाठी विपणन आणि प्रसिद्धीचे प्रशिक्षण शिबीर राबविण्यात येणार आहे.

केवळ महिलाच नव्हे तर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी यांनादेखील नियोजन विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या परिघात पालिकेने आणले आहे. २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात आपण दिव्यांग व्यक्तींकरिता 'धर्मवीर आनंद दिघे दिव्यांग अर्थसहाय्य योजना' १ एप्रिल २०२४ पासून सुरू करीत आहोत.

# पुणे महापालिका आयुक्तपदी डॉ. राजेद्र भोसले ; विक्रम कुमार यांची बदली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**






पुणे: पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांची अखेर बदली झाली आहे. त्यांच्या जागी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेद्र भोसले यांची पुणे महापालिका आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. विक्रम कुमार यांची एमएमआरडीएच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य सरकारने अनेक महत्त्वपूर्ण पदांवरील अधिकाऱ्यांच्या आज बदल्या केल्या आहेत .त्यात पुणे महापालिकेच्या आयुक्त पदावरून विक्रम कुमार यांची बदली करण्यात आले. डॉ. राजेद्र भोसले यांची पालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विक्रम कुमार यांची एमएमआरडीएच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विक्रम कुमार हे २००४च्या बँचचे अधिकारी आहेत. डॉ. राजेंद्र भोसले हे मुंबई उपनगर येथे जिल्हाधिकारी होते. त्यापुर्वी भोसले यांनी नगर येथे जिल्हाधिकारी म्हणुन काम केले आहे. भोसले यांनी नगर जिल्ह्यात महसूल विभागाचे डिजिटल उतारे देण्याचा निर्णय घेतला होता. भोसले यांच्या कार्यकाळात नूतन जिल्हाधिकारी कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. भोसले यांचा सप्तपदी अभियानाचा उपक्रम राज्यभर गाजला.

# भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांना ईडीने घेतले ताब्यात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भारत राष्ट्र समितीच्या नेत्या, विधानपरिषदेच्या आमदार आणि माजी मुख्यमंत्री केसीआर यांची मुलगी के. कविता यांची शुक्रवारी प्राप्तीकर विभाग आणि ईडीकडून ताब्यात घेण्यात आले. के. कविता यांच्या हैदराबादमधील निवासस्थानी दोन्ही तपास यंत्रणांनी छापेमारी केल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आज दुपारी दिल्लीहून १० अधिकारी चौकशीसाठी हैदराबादमध्ये आले होते. के. कविता आणि त्यांचे पती डी. अनिल कुमार यांच्या समोरच घराची झडती घेण्यात आली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्ली अबकारी धोरण प्रकरणाशी संबंधित ही चौकशी करण्यात येत आहे. दिल्लीतील मद्य घोटाळ्यात के. कविता यांचेही नाव गुंतले होते.



ईडीने आपल्या आरोपपत्रात नमूद केल्यानुसार, केसीआर यांच्या सुपुत्री असलेल्या कविता या आम आदमी पक्षाला १०० कोटींची लाच देणाऱ्या 'साऊथ ग्रुप'च्या भाग आहेत. दिल्लीतील अबकारी धोरण बदलून आपल्याला फायदा मिळेल, असे धोरण आखण्यासंबंधी ही लाच देण्यात आली होती. कविता यांनी मात्र त्यांच्यावरील आरोप फेटाळून लावले होते. तसेच ईडीची नोटीस ही मोदी नोटीस असल्याची बोळवण त्यांनी केली होती.

ईडीने कथित मद्यविक्री घोटाळ्यासंदर्भात दोन आरोपपत्रे दाखल केली आहेत. या आरोपपत्रांत दक्षिण गटाने दिल्लीमधील घाऊक आणि किरकोळ मद्यविक्री क्षेत्रात प्रवेश करता यावा, म्हणून लाच दिल्याचा दावा करण्यात आला आहे. ईडीच्या तक्रारीनुसार आम आदमी पार्टीचे कम्युनिकेशन इन्चार्ज विजय नायर यांना दक्षिण ग्रुपने १०० कोटी रुपये दिले होते. विजय नायर यांनी 'आप'चे प्रतिनिधित्व केले होते. या दक्षिण गटामध्ये आंध्र प्रदेशमधील ओंगले येथील खासदार मागुंता श्रीनिवासुलू रेड्डी, तेलंगाणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची कन्या कलवकुंतला कविता (के. कविता) अशा दिग्गज व्यक्तींचा समावेश आहे. तसेच या दक्षिण ग्रुपमध्ये मागुंता रेड्डी यांचे पुत्र राघव रेड्डी, अरबिंदो फार्मा कंपनीचे संस्थापक पी. व्ही. रामप्रसाद रेड्डी यांचे पुत्र पी. सारनाथचंद्र रेड्डी यांचाही यामध्ये समावेश आहे.

# अंबाबाई मूर्तीबाबतचा अहवाल २५ ला सादर होणार! सलग दुसऱ्या दिवशी मूर्तीची पाहणी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर: करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी तज्ञांनी पाहणी केली. मूर्तीबाबतचा सविस्तर अहवाल २५ तारखेला न्यायालयाला सादर करण्यात येणार आहे. याविषयावरील पुढील सुनावणी ४ एप्रिलला होणार असून त्यात या अहवालावर चर्चा होईल.करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची मोठी झीज झाली असून मूर्तीवरील संवर्धनाचा लेप गळून पडत आहे. त्या पार्श्वभूमीवर न्यायालयीन आदेशाने गेल्या दोन दिवसांपूर्वी पुरातत्व विभागाचे निवृत्त अधिकारी आर. एस. त्र्यंबके व विलास मांगिराज यांनी मूर्तीची पाहणी केली. शुक्रवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत ही पाहणी झाली. यावेळी स्वत: जिल्हाधिकारी अमोल येडगे, पुरातत्व विभागाचे सहसंचालक विलास वहाने यांच्यासह ड, प्रसन्न मालेकर, दिलीप देसाई यांच्यासह वादी प्रतिवादी उपस्थित होते. हे अधिकारी अंबाबाई मूर्ती पाहणीचा आपला अहवाल २५ मार्च रोजी न्यायालयाला सादर करणार आहेत. याविषयावरील पुढील सुनावणी ४ एप्रिल रोजी होणार असून त्यादिवशी अहवालावर चर्चा होईल.

# शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये ज्येष्ठ महिलेला अडीच कोटींचा गंडा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : शेअर मार्केट ट्रेंडिंगच्या नादात एका ज्येष्ठ महिलेने अवघ्या दीड महिन्यात तब्बल २ कोटी ८४ लाख ५९ हजार रुपये गमविले आहे. याप्रकरणी सेनापती बापट रोड परिसरात राहणाऱ्या एका ७० वर्षीय महिलेने गुरुवारी (दि. १४) सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार १५ जानेवारी ते २९ फेब्रुवारी २०२४ यादरम्यानच्या काळात घडला आहे. फिर्यादी महिलेला सायबर चोरट्याने फेसबुकवरून संपर्क साधला. शेअर मार्केट मध्ये गुंतवूण केल्यास चांगले परतावा मिळेल असे आमिष दाखवले. महिलेने पैसे गुंतवण्यास होकार दिल्यानंतर त्यांना एक लिंक पाठवून व्हाटसअप ग्रुप जॉईन करायला सांगितले. महिलेने व्हात्साप्प ग्रुप जॉईन केल्यावर ट्रेडिंग करण्यासाठी एक ऍप डाऊनलोड करायला सांगितले. यात फिर्यादी यांनी अप्लिकेशन डाउनलोड करून गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. यानंतर त्यांच्या ऍपवर शेअर ट्रेडिंग मधून फायदा झाल्याचे दिसून येत होते. मात्र तिवारी यांना ते पैसे काढता येत नव्हते. यावेळी त्यांनी सायबर चोरट्याशी संपर्क केला तेव्हा वेळोवेळी सेबीची आणि मिळालेला नफा आणि पैसे मिळणार नाही अशी भीती दाखऊन आणखी पैसे भरायला सांगितले. मात्र पैसे मिळणार नाही याची खात्री झाल्यावर तक्रारदार महिलेने सायबर चोरट्या विरोधात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार व्हाटसअप ग्रुप वरील विविध नंबर, विविध बँक धारका विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सायबर चोरटे करत आहेत.


# पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानी कंपनीकडून भारतातल्या राजकीय पक्षांना देणग्या?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

निवडणूक आयोगाने निवडणूक रोखे वटवणाऱ्या पक्षांची यादी सादर केली आहे. त्याचबरोबर निववडणूक रोखे खरेदी करणाऱ्या व्यक्ती आणि कंपन्यांची यादीदेखील प्रसिद्ध केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांना घटनाबाह्य ठरवल्यानंतर आता निवडणूक आयोगाने देणगीदारांची यादी प्रसृत केली आहे. त्यामुळे आता निवडणूक रोख्यांच्या लाभार्थी पक्षांची चर्चा सुरू झाली आहे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देशात सर्वाधिक शक्तिमान असलेल्या भारतीय जनता पार्टीला सर्वाधिक लाभ झाला आहे. निवडणूक रोख्यांसदर्भात निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षांमधील निवडणूक रोख्यांपैकी ४७.५ टक्के निवडणूक रोखे एकट्या भाजपाने वटवले आहेत. १२ एप्रिल २०१९ ते २४ जानेवारी २०२४ या काळात भाजपने ६०६०.५ कोटी मूल्यांचे रोखे वटवले म्हणजेच त्यांचे रोखीत रुपांतर केले. भाजपासह तृणमूल काँग्रेस, काँग्रेस आणि दक्षिण भारतातल्या पक्षांनाही भरघोस देणग्या मिळाल्या आहेत.

निवडणूक आयोगाने निवडणूक रोखे वटवणाऱ्या पक्षांची यादी सादर केली आहे. त्याचबरोबर निववडणूक रोखे खरेदी करणाऱ्या व्यक्ती आणि कंपन्यांची यादीदेखील प्रसिद्ध केली आहे. यामध्ये हब पॉवर कंपनीचाही समावेश आहे. या हब पॉवर कंपनीच्या देणग्यांचा उल्लेख करत समाजमाध्यमांवर एक मेसेज व्हायरल होत आहे. या मेसेजमध्ये दावा करण्यात आला आहे की, ही हब पॉवर कंपनी पाकिस्तानमध्ये नोंदणीकृत आहे. समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या पोस्टमध्ये दावा करण्यात



आला आहे की, पाकिस्तानमधील हब पॉवर लिमिटेड कंपनीने भारतातल्या राजकीय पक्षांना देणग्या दिल्या आहेत. पुलवामा हल्ल्याच्या एक आठवड्यानंतर हब पॉवरने भारताल्या राजकीय पक्षाला देणगी दिली आहे. परंतु, लोकसत्ताने या मेसेजमधील दावे तपासून पाहिले आणि हे दावे चुकीचे असल्याचं आढळलं आहे. कारण ही पाकिस्तानी कंपनी नसून भारतातली नोंदणीकृत कंपनी आहे.

# माढ्यात मोहिते-पाटील शांत ; मात्र समर्थक आक्रमक; 'तुतारी' वाजू लागली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सोलापूर : माढ्यात भाजपच्या उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार राहिलेले धैर्यशील मोहिते-पाटील डावलून खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनाच पुनश्च संधी मिळाल्यामुळे मोहिते-पाटील समर्थकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. मात्र मोहिते-पाटील कुटुंबीय कोणतीही प्रतिक्रिया न देता शांत आणि पुढे पाहा या भूमिकेत असताना त्यांच्या समर्थकांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाची तुतारी वाजविण्यास सुरुवात केल्यामुळे मोहिते-पाटील यांच्या पुढील भूमिकेविषयी औत्सुक्य निर्माण झाले आहे.

यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य गड मानल्या जाणाऱ्या माढा मतदारसंघात ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये गेल्यानंतर मागील लोकसभा निवडणुकीत भाजपचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना निवडून येणे शक्य झाले होते. आता राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या पाठिंब्यामुळे भाजपची ताकद आणखी वाढली आहे. दरम्यान, खासदार निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्यात बेबनाव झाल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभा निवडणुकीसाठी माढ्यातून धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उभे राहण्याची जोरदार तयारी केली होती. खासदार निंबाळकर व मोहिते-पाटील यांच्यात सुरू झालेली रस्सीखेच चर्चेचा विषय ठरला असताना अखेर भाजपने खासदार निंबाळकर यांना पुनःश्च संधी दिली. त्यामुळे मोहिते-पाटील गटाला धक्का बसला आहे.

उमेदवारीविषयी मोठा आत्मविश्वास बाळगलेल्या मोहिते-पाटील गटात आता कमालीचे नैराश्य आणि संताप पसरला असून समाज माध्यमांवर मोहिते-पाटील समर्थक आक्रमक होऊन, माढा-निंबाळकरांना पाडा, असा धोशा लावला आहे. एवढेच नव्हे तर कोणत्याही परिस्थितीत धैर्यशील मोहिते-पाटील हे माघार न घेता माढ्यातून निंबाळकर यांना आव्हान देणारच, अशी गर्जनाही त्यांचे समर्थक करीत आहेत.

# महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंप होणार?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजप, काँग्रेसने उमेदवारांची यादी जाहीर केली. यामध्ये भाजपाने महाराष्ट्रातील २० उमेदवारांची यादी जाहीर केली. मात्र, महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. तर दुसरीकडे महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाची उमेदवारांची यादी बाकी आहे. महायुतीमधील कोणताही वाद नसलेल्या जागा भाजपाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. आता शिवसेना शिंदे गटाची यादी रविवारी किंवा सोमवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मोठे भाष्य केले आहे.

# 'ताई आणि वहिनींना मत देणं, ही लोकशाहीची थट्टा'

## विजय शिवतारेंची पवार कुटुंबावर पुन्हा टीका

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बारामती लोकसभा मतदारसंघाची राज्यात नव्हे तर देशात चर्चा सुरू आहे. खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार अशी नणंद-भावजय लढत होण्याची शक्यता आहे. खासदार सुप्रिया सुळे या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून तर उमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून मैदानात उतरणार असल्याची चर्चा आहे. याबाबत हालचालीही सुरु आहेत. नणंद-भावजय अशी लढत होण्याची शक्यता असल्यामुळे ही निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटासाठी प्रतिष्ठेची मानली जात आहे. मात्र, या निवडणुकीत नवा ट्विस्ट आला असून शिवसेनेचे नेते विजय शिवतारे हे बारामती लोकसभेची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

बारामती लोकसभेची निवडणूक लढवण्यासंदर्भात विजय शिवतारे यांनी इच्छादेखील व्यक्त केली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटावर त्यांनी जोरदार प्रहारही केला. सध्या राज्यात शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपा महायुतीचे सरकार आहे. पण शिवसेनेचे विजय शिवतारे यांनी महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या विरोधातच दंड थोपटल्यामुळे युतीत वादाची ठिणगी पडू शकते. त्यामुळे याची तातडीने दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विजय शिवतारे यांना बोलावून घेत त्यांच्याशी चर्चा करत समजूत घातली. मात्र, तरीही विजय शिवतारे ऐकण्याच्या मनस्थितीत असल्याचे दिसत नाही.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर आज (१५ मार्च) विजय शिवतारे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर टीका केली. विजय शिवतारे म्हणाले, ताई आणि वहिनी ही लोकशाही चुकीची आहे. फक्त त्या कोणाच्या पत्नी आहेत, म्हणून त्यांना मते द्यायची हे चूक आहे. आम्ही किती वर्ष पुन्हा-पुन्हा त्यांनाच मतदान करणार आहोत. काय मिळाले आम्हाला? उद्या तुम्ही म्हणताल माझी पत्नी आहे मते द्या, ही माझी मुलगी आहे मते द्या, ही लोकशाहीची थट्टा आहे, असे विजय शिवतारे म्हणाले.

गेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांना अजित पवारांनी थेट आव्हान दिले होते. शिवतारे कसे निवडून येतात तेच पाहतो?, असे अजित पवार म्हणाले होते. यानंतर विजय शिवतारे यांचा पराभव झाला होता. त्यामुळे विजय शिवतारे यांनी आता 'टायमिंग' साधत बारामती लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या हालचाली सुरू केल्या. विजय शिवतारे निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर बारामती लोकसभा निवडणूक तिरंगी होण्याची शक्यता आहे.

# निवडणूक रोख्यांचा विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाची एसबीआयला नोटीस

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या निवडणूक रोख्यांचा तपशील अखेर निवडणूक आयोगाने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर भारतीय स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांची माहिती निवडणूक आयोगाला दिली आणि आयोगाने आता ही माहिती जाहीर केली आहे. आयोगाने निवडणूक रोख्यांच्या सर्व व्यवहारांचे तपशील त्यांच्या संकेतस्थळावर शेअर केले आहेत. यामध्ये कोणी किती रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती रुपयांचे निवडणूक रोखे मिळाले, याची माहिती जाहीर करण्यात आली आहे. परंतु, कोणत्या व्यक्तीने अथवा कंपनीने कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, याची माहिती समोर येऊ शकली नाही. त्यामुळे यासंदर्भात महत्त्वाचा घटक असणारा निवडणूक रोख्यांचा विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला नोटीस जारी केली आहे. त्यामुळे आता कोणी कोणत्या पक्षाला किती रुपयांचं दान दिलंय याबाबतची माहिती समोर येईल.

निवडणूक रोख्यांद्वारे राजकीय पक्षांना सर्वाधिक देणगी देणाऱ्या पहिल्या ३० कंपन्यांपैकी निम्म्या कंपन्या अशा आहेत ज्यांच्यावर अलीकडच्या काळात केंद्रीय तपास यंत्रणांनी कारवाई केली आहे. या कंपन्यांवर अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), आयकर विभागाने (आयटी) धाडी टाकल्या होत्या, तसेच इतरही कारवाया केल्या होत्या. त्यामुळे केंद्र सरकारवर आरोप होत आहे की, केंद्रीय तपास यंत्रणांची भीती दाखवून केंद्रातल्या भाजपा सरकारने या कंपन्यांकडून निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून पैसे उकळले आहेत. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून जितके व्यवहार झाले आहेत त्यापैकी ४६ टक्क्यांहून अधिक पैसे भाजपाला मिळाले आहेत.

कर्नाटकमधील प्रसिद्ध महिला उद्योजिका, बायोकॉन लिमिटेड कंपनीच्या अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक किरण मुजुमदार-शॉ यांनीदेखील राजकीय पक्षांना देणग्या दिल्या आहेत. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या तपशीलांमध्ये किरण मुजुमदार यांचंदेखील नाव आहे. किरण मुजुमदार यांनी सहा कोटी रुपयांचे २४ निवडणूक रोखे खरेदी केले होते. हे निवडणूक रोखे राजकीय पक्षांनी वटवले आहेत. हे पैसे नेमक्या कुठल्या पक्षाला मिळाले आहेत हे अद्याप समोर आलेलं नाही.

दरम्यान, एका युजरने मुजुमदार यांनी खरेदी केलेल्या निवडणूक रोख्यांची माहिती एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केली आहे. या युजरने मुजुमदार यांना प्रश्न विचारला की, कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या एक महिना आधी तुम्ही पाच कोटी रुपयांची देणगी दिलीत? त्यावर मुजुमदार म्हणाल्या, तुमचं गणित चुकलं आहे, पुन्हा एकदा बेरीज करा. त्यावर त्या युजरने चूक दुरुस्त करून म्हटलं आहे, तुम्ही सहा कोटी रुपयांची देणगी दिलीत, तुम्हालाही देणगी मागितली होती का? त्यावर किरण मुजुमदार म्हणाल्या, सर्वच पक्षांना निधी हवा असतो.